जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
ईमेल :- cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र. ९८१९२०८२७९

प्रेस नोट

दिनांक २५/०३/२०२६

‘‘अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर ची कामगिरी ’’

‘‘ ४,१२,४०,०००/- रू किंमतीचा २ किलो ६२ ग्रॅम वजनाचा एम.डी. या अंमली पदार्थासह ३ आरोपी अटक केलेबाबत.’’

मा. पोलीस आयुक्त, ठाणे यांनी अंमली पदार्थ विरोधात विशेष मोहीम राबविण्या संदर्भात आदेश दिले होते. त्या अनुषंगाने मा. वरिष्ठांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथकाने विशेष मोहिम राबवुन खालीलप्रमाणे उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

सदर मोहीमेअंतर्गत पोहवा/ गिरीष पाटील यांना मिळालेली गोपनीय माहिती त्यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक/जनार्दन सोनवणे यांना दिली. त्यानंतर मा. वरिष्ठांची रितसर परवानगी घेवुन वपोनि/जनार्दन सोनवणे यांनी सपोनि/सोमनाथ कर्णवर पाटील, पोउपनि/दिपक डुम्मलवाड व पथकास प्राप्त माहितीच्या अनुषंगाने योग्य ती शहानिशा करून कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. सदर पथकाने दिनांक दिनांक २३/०३/२०२६ रोजी १९:१० वा. चे सुमारास एमटीएनएल ऑफीसच्या समोर, चरई, ठाणे येथे इसम नामे १) सोहेल दिलीप खान वय २६ वर्षे, रा. कोपरी, ठाणे याने आपले कब्जात एकुण १ किलो ५६ ग्रॅम तसेच २) रोहीत विलास सितापुरे वय २१ वर्षे, रा. गायकवाड पाडा नं २, उल्हासनगर याने आपले कब्जात एकुण १ किलो ६ ग्रॅम वजनाचा मेफेड्रॉन (एमडी) पावडर हा अंमली पदार्थ असा **एकुण ४,१२,४०,०००/- रू किंमतीचा एकुण २ किलो ६२ ग्रॅम वजनाचा ‘एमडी (Mephedron) हा अंमली पदार्थ आपसात संगनमत करून विक्री करण्यासाठी बेकायदेशीरपणे बाळगले असताना मिळून आले.**

सदरबाबत नौपाडा पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्रमांक ८१/२०२६ एनडीपीएस कलम ८(क), २१(क), २९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. **नमुद गुन्हयाचे बॅकवर्ड लिंकच्या तपासात आरोपी नामे राजेश हडावले वय २३ वर्षे, रा. कोपरी, ठाणे यास निष्पन्न करून त्यास देखील अटक करण्यात आले आहे.** नमुद गुन्हयाचा तपास पोउपनि/दिपक डुम्मलवाड हे करीत आहेत. अटक आरोपी यांची दिनांक २८/०३/२०२६ रोजीपावेतो पोलीस कोठडी मंजुर आहे.

यातील अटक आरोपी याचेकडून जप्त करण्यात आलेला ‘‘एमडी’’ हा अंमली पदार्थ कोणाकडुन आणला ? कोणास विक्री करणार होते? या अनुषंगाने पुढील तपास सुरू आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, ठाणे, मा. श्री. रविंद्र दौंडकर, सहा. पोलीस आयुक्त, प्रतिबंध, गुन्हे, ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जनार्दन सोनवणे, सपोनि/ निलेश मोरे, सपोनि/सोमनाथ कर्णवर-पाटील, पोउपनि/दिपक डुम्मलवाड, पोउपनि/राजेंद्र निकम, ग्रेंडपोउपनि/मोहन परब, पोहवा/अमोल देसाई, पोहवा/संदीप चव्हाण, पोहवा/हरीष तावडे, पोहवा/नंदकिशोर सोनगिरे, पोहवा/अमोल पवार, पोहवा/हुसेन तडवी, पोहवा/अजय सपकाळ, पोहवा/अमित सपकाळ, पोहवा/अभिजीत मोरे, पोहवा/गिरीष पाटील, पोशि/आबाजी चव्हाण, चापोना/ अनुप राक्षे, मपोहवा/ शिल्पा कसबे, मपोशि/ कोमल लादे यांनी केली आहे.

आवाहन:- अंमली पदार्थ विक्री, साठवणुक, वाहतुक, सेवन करणे हा अपराध असुन यामध्ये सहभागी असलेले इसमांबाबत कोणतीही माहिती उपलब्ध असल्यास अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर येथे द्यावी. माहिती देणारे इसमांची नांवे गुप्त ठेवली जातील.

----------oooooooooooooooo----------